REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2018

# भगतसिंगांच्या राजकीय विचारांचे चिंतन

डॉ. सुहास रंगनाथ मोराळे[१] , गीता शंकर गाडेकर[२]
[१]विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग , स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड .
माजी संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
[२](पीएच.डी संशोधक विद्यार्थी) , डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद .

## प्रस्तावना :

भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी अनेक महापुरूषांनी,क्रांतीकारकांनी संघर्ष केले, बलीदान दिले तेव्हापुढे स्वातंत्र्यांची गोड फळे आपण चाखु शकलो. या महापुरूषांपैकीच एक म्हणजे, स्वातंत्र्यासाठी सर्वत्याग करूण वयाच्या २३ व्या वर्षी देशासाठी हुतात्मा होणारा थोर महापुरूष क्रांतिकारक शहिंद भगतसिंग होय. त्यांनी वसाहतवादाविरोधी संघर्ष करतांनाच आपल्या गाढया अभ्यासावर आधारित देशातील परिस्थितीला अनुसरून अनेक विचार मांडले त्यापैकीच महत्वाचा असलेला एक विचार म्हणजे राजकीय विचार होय. भगतसिंगांनी राजकारणाबाबत विचार मांडताना म्हटले की, विद्यार्थ्यांनी राजकारणात भाग घ्यावा आणि या गोष्टीचे ते समर्थन करतात. पंजाबमध्ये कुठलाच विद्यार्थी राजकारणात भाग घेत नव्हता. पंजाबला राजकीयदृष्टयामागासलेला म्हटल्याजाते. पंजाबमध्ये राजकीय नेता बनण्यासाठी खुप अडचणींचा सामना करावा लागतो. तरूण विद्यार्थ्यांनी राजकारणात भाग घेवू नये अशा मताची चर्चा १९२८ दरम्यान राजकारणात सुरू होती.विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये प्रवेश देतानाच राजकीय कार्यात भाग घेणार नाही, अशा आशयाच्या अटीवर स्वाक्षरी करायला भाग पाडले जायचे. पंजाब सरकारची ही तऱ्हा अगदीच न्यारी होती. त्यापलीकडे जावुन लोकांनीच निवडून पाठवलेला मनोहर जो त्यावेळी शिक्षणमंत्री होता. 'विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी राजकारणात भाग घेवु नये' अशी परिपत्रके शाळा कॉलेजच्या नावे काढतो हे दुर्भाग्यच. काही दिवसांपूर्वी लाहोरमध्ये स्टुडंट्स युनिटतर्फे विद्यार्थी सप्ताह साजरा केला गेला. तेथे सुध्दा सर अब्दुल कादर आणि प्रा. इश्वरचंद्र नंदा यांनी सुध्दा विद्यार्थ्यानी राजाकारणात भाग घेवु नये या मतावर भर दिला.

## भगसिंगांचे राजकीय विचार :

पंजाबमधील राजकीय नेते आणि सरकारचेही असे म्हणने होते की, विद्यार्थ्यांनी राजकारणात भाग घेवु नये. पंजाबला राजकीयदृष्टया मागासलेला समजण्यात येते. याचे कारण हे नाही की, येथे बलीदान देणारे कमी आहेत. अनेक सकंटांचे प्रहार त्यांनी सोसले असतांनाही असे का, तर आम्हाला देण्यात येणार शिक्षण कुचकामी आहे. विद्यार्थी आणि तरूणांना देशाच्या कारभारात काडीमात्रही रस नसतो त्याबद्दल त्यांना कसलेही ज्ञान नसते. ज्या तरूणांना उद्या देशाची धुरा हाती घ्यायची आहे त्यांना आजपासुन आधंळे अनुयायी बनवायचा उद्योग सुरू आहे. विद्यार्थ्यांचे मुख्य कर्तव्य शिक्षण घेणे हे आहे, म्हणून त्यांनी आपल संपुर्ण लक्ष अभ्यासात गुंतवायला हवं,परंतु देशाच्या परिस्थितीच ज्ञान आणि त्यात सुधारणा करण्याचे उपाय यावर विचार करण्याची क्षमता निर्माण करणे याचा मात्र या शिक्षणात समावेश होत नाही. फक्त कारकुणी करायला शिकवायच असेल तर त्या शिक्षणाच काम काय? असा प्रश्न भगतसिंग यांनी उपस्थिती केला होता. अतिचलाख मंडळी असेही म्हणतात की, तुम्ही राजकीय गोष्टी शिका त्यावर विचार करा मात्र,आताच व्यवहारिक राजकारणात भाग घेवु नका, कारण तुम्ही आणखी शिकुन लायक बनुन उद्या देशाची सेवा करणे हेच देशाच्या फायद्याचं आहे.



आजच्या काळात देशाला तन—मन—धन अर्पण करणाऱ्या आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी झापाटलेपणान आपल सार आयुष्य झोकुन देणाऱ्या देशसेवकांची गरज आहे, हे आज सर्वसामान्य आहे. अशी माणसे वृध्दामधुन पुढ येणार आहेत का? कुटूंब आणि संसाराच्या रामरगडयात अडकलेल्यांमधुन असे लोक मिळतील का? तर नाही, जे कोणत्याही जंजाळात अडकलेले नाहीत असे नवयुकच अशा कार्यासाठी पुढे येवु शकतात. जर त्यांनी काही व्यवहारिक ज्ञान मिळवलं असेल तर अशा जंजाळात पडण्यापुर्वीच विद्यार्थी विचार करू शकतील. गणित आणि भुगोलाची नुसती पेपर लिहिण्यासाठी धोंकपट्टी केलेल्या विद्वानांकडून आपण अशी अपेक्षा करू शकत नाही.

जालियनवाला बाग हत्याकांडानंतर इंग्रजांनी जातीय दंगलीचा बराच वापर केला, त्याचा परिणाम म्हणुन १९२४ साली लहोरमध्ये अतिशय अमानुषपणे हिंदु—मुस्लिम दंगलीझाल्या, या आशयावर आपले विचार मांडतांना भगतसिंग म्हणतात की, धर्माला राजकारणापासुन वेगळ ठेवल पाहिजे. धर्म ही व्यक्तीगत बाब आहे. त्याला राजकारणात आणु नये, जी सगळयांना एकत्र येण्यास बाधक आहे. १९१४ — १५ च्या काळातील हुताम्यांनी धर्माला राजकारंणापासुन वेगळे केले होते. त्यात शीखपुढे येवुन फाशी गेले आणि हिंदु व मुस्लिम देखील मागे राहले नाही. धर्माला राजकारणापासुन वेगळे करू पाहणारे काही भारतीय नेते यावेळी मैदानात उतरले आहेत, झगडा संपवुन टाकण्याचा हा एक सुंदर उपाय आहे आणि आम्ही त्याचे समर्थन करतो,धर्माच्या बाबतीत आपण वेगळे असलो तरी. जर धर्माला वेगळे केले तर राजकारणाच्या बाबतीत आपण सर्व एकत्र येवु शकतो.

थोडक्यात भगतासिंगांनी राजकारणावरील आपले विचार माडतांना विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच राजकारणातही सहभागी व्हावे जेणेकरून देशातील नकारात्मक परिस्थितीवर उपाय काढण्याची क्षमता त्याच्यात निर्माण होवुन देशाच नेतृत्व ते योग्य प्रकारे करू शकतील, त्याचबरोबर धर्म ही व्यक्तीगत बाब असल्याने धर्माला राजकारणात आणु नये. धर्म हा राजकारणात एकत्र येण्यास बाधा निर्माण करतो आहे. म्हणून धर्म राजकारणापासुन वेगळा ठेवण्याचा विचार भगतसिंग मांडतात. २८ सप्टेंबर १९०७ हा भगतसिंगांचा जन्मदिवस. अवघ्या सोडतेवीस वर्षाचे आयुष्य लाभलेल्या भगतसिंगाचे स्मरण त्यांच्या जन्माला ११० वर्षे होत असतानाही केले जाते. याचे कारण भगतसिंग क्रांतिकारण आंदोलनाचे नेते होते आणि ते व त्याचे साथीदार अतुलनीय धैर्याने फासावर चढले, इतकेच नाही तर आपल्या कुशाग्र बुध्दीने, वैज्ञानिक दृष्टिकोनाने,आणि सखोल अध्ययनाने त्यांनी भारतीय समाजाच्या परिवर्तनाचे स्वप्न पाहिले, त्यासाठी जे विचार मांडले ते विचार आजही प्रासंगिक त्र्आहेत.

भगतसिंगांच्या चिंतनाचा केंद्रबिंदु सामान्य माणुस व शोषित, पीडित समाज होता ते सर्वांसाठी समान न्यायाची मागणी करत होते. ते समता, बधुंता आणि विश्वप्रेमावर विश्वास ठेवणारे विचारवंत होते. आज देश स्वतंत्र झाला आहे, तरीही लोकांवर अत्याचार होत आहे. शेवटी आपण असे म्हणू शकतो की, स्वतंत्र भारतात आजही समस्यांनी अपले घर केले आहे. फक्त समस्याच स्वरूप बदलले आहे. नाटक तेच आहे फक्त प्रेक्षक बदलले आहे. या स्थितीला बदण्यासाठी भगतसिंगाचे विचार वर्तमानकाळातही प्रासंगिक ठरत आहे.

भगतसिंगांचे प्रौढ राजकीय चिंतन एकीकडे तर गदर पार्टीच्या विकासाची वेगळी परंपरा दुसरीकडे. देशातील कम्युनिस्ट आदोलनाच्या विकासातील कालाखंडाचे चित्रण आहे. ज्याचे भगतसिंग स्वत: अभिन्न अंग आहे. भगतसिंग म्हणतात, पंजाबला राजकीयदृष्टया मागासलेला म्हटल्या जाते याचकारण काय आहे? का पंजाबने बलीदान दिलेले नाही? पंजाबने संकटे पचविलेली नाही? त्यांना वाटायचे की विद्यार्थ्यांना व युवकांना शाळेत व कॉलेजमध्ये राजकारणाविषयी शिक्षण द्यायला पाहिजे. भविष्यात मोठा नेता बनवण्याच्या दृष्टिकोनातून आपण विद्यार्थ्यांना शिकवले पाहिजे. या कारणामुळेच ते म्हणतात, विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये दाखल होण्याअगोदर अशा आशयावर स्वाक्षरी करून घेतल्या जायची की ते राजकाराणात भाग घेणार नाही.

भगसिंगांनी आपले राजकारणाविषयीचे विचार आपल्या 'विद्यार्थी आणि राजकारण' या लेखामध्ये मांडले आहेत. ते असे विद्यार्थी निर्माण करू इच्छीतात की जे पुढे चालुन मोठयात— मोठे नेते बनतील.ते राजकीयशिक्षणाचे समर्थक होते, जे राजकीय नेता क्रांतीकारी व देशभक्तांचे कल्यान करेल. वर्तमान काळातही देशाला कल्यानाचे कार्य करणारा नेता, क्रांतीकारी आणि देशभक्तांची आवशकता आहे. आज

आपल्याला स्वार्थी नेतेच दिसतात. या स्थितीत बदल घडुन आणण्यासाठी आपल्याला आज अब्दुल कलाम यांच्यासारखे नेते निर्माण करावे लागतील. आपल्या देशाला भ्रष्ठ नेते खात आहेत. आपल्या स्वार्थी वृत्तीमुळे विदेशातील स्विसबॅकेत काळा पैसा जमा करत आहेत हा एकप्रकारचा देशद्रोहच आहे. आज आपल्याला भगतसिंगांसारख्या देशप्रेमी, निधर्मी व समाजवादी दुरदृष्टीवाल्या नेत्याची गरज आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाले परंतु इतक्या वर्षात आजही भारतात झोपडपट्टीमध्ये, फुटपाथवर लोक आपले जीवन लगतात. भगसिंगांच्या विचारांची प्रासंगिकता आहे. भगतसिंगाना इंग्रजी सत्तेपासुन स्वतंत्र पाहीजे नव्हते तर त्यांना समाजातील उपासमारी, दु:ख अन्याय, अत्याचा व दारिद्रिय याला सुध्दा संपवायचे होते त्याच्या मते जोपर्यत हे प्रश्नर सुटणार नाहीत तोपर्यत आपण खर स्वातंत्र उपभोगु शकता नाही. त्यामुळे भगसिंगांचे विचार प्रासंगिक ठरतात.

## सारांश :

भगतसिंगांचे विचार आपल्यासमोर एक आदर्श उभा करतात. आपल्या देशातील महाविद्यालय व विद्यापीठामध्ये विद्यार्थी संसदव त्याचे अध्यक्ष, सचिवांच्या निवडणुका होतात, कदाचीत याचे कारण भगतसिंगांद्वारा लिहीलेला'विद्यार्थी आणि राजकारण' हा लेख आहे.

राजकारणाामध्ये आजही नेते बोलतात एक आणि करतात एक, त्यांचे खाण्याचे दात वेगळे तर दाखवण्याचे दात वेगळे आहेत. आमचे राजकीय नेते निवडणुकांच्या वेळी मोठया—मोठया गोष्टी करतात, परंतु त्यांना पुर्ण करण्याची वेळ येते तेव्हा त्याला विसरून जातात. निवडणुकांच्या वेळी पैशाचा वापर करून व धार्मिक, जातिय भावनांचा आधार घेवुन निवडणुका लढवतात. म्हणून भगतसिंग म्हणतात अशा षडयंत्रणा थांबवण्यासाठी, कायमच्या बंद करण्यासाठी एक महत्वपुर्ण इलाज म्हणजे. जगातील गरीबी आणि गुलामी दुर झाली पाहजे प्रत्येक देश स्वातंत्र्यासोबत पोटाचा प्रश्नही सोडवू शकला पाहीजे.

त्याच प्रमाणे भगतसिंगांच्या मते युवकांनी राजकारणात भाग घेवुन राजकारणाचे डावपेच शिकनेही तेव्हढेच गरजेचे आहे. त्यासाठी सरकारने युवकाना राजकिय शिक्षण देणे गरजेचे आहेत. आज जर सामुहिक राजकारण करायच झाल्यास धर्माला राजकारणापासुन वेगळे ठेवनेच सोयस्कर असेल.

## संदर्भ :

१. डॉ. ढवळे अशोक (सं.), डॉ. पाटकर रमेशचंद्र, शहीद भगतसिंह आठवणी, विवेचन आणि विचार, जनशक्ती प्रकाशने.
२. डॉ. ढवळे अशोक, शहिद भगतसिंह एक मृत्युंजयी क्रांतीकारक जनशक्ती प्रकाशन.
३. (ले.) भगतसिंह, (सं.) पद्मा लक्ष्मी, भगतसिंह के विचार नवप्रभात साहित्य.
४. (सं.) डॉ. अशोक ढवळे, डॉ. पाटकर रमेचंद्र, शहिद भगतसिंह आठवणी, विवेचन आणि विचार जनशक्ती प्रकाशन